# हे राम ;ठेवीदार झाले हैराण

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -६२ | मंगळवार दि.२१ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -62 | TUESDAY DT.21 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4




बीड : जिल्ह्यात मल्टीस्टेट आणि पतसंस्थाच्या फसव्या धोरणांमुळे खळबळ उडाली असताना आता साईराम अर्बन बँकेच्या बाहेर ग्राहक मोठी गर्दी करू लागल्याचे चित्र बीड शहरातील माळीवेस भागात पाहायला मिळत आहे. बँकेत घोटाळा झाल्याच्या चर्चांना आज सकाळपासून पेव फुटले असून या बँकेचे अध्यक्ष शाहिनाथ परभणे यांचा दूरध्वनी क्रमांक बंद लागत आहे. बीड जिल्ह्यात शाहीनाथ परभणे यांच्या 'साईराम' अर्बनने जिल्ह्यात स्वतःचे मोठे जाळे निर्माण केले आहे. या मल्टीस्टेटचे जाळे जिल्हाभर विस्तारले असून ठेवीची संख्या ही लक्षणीय आहे. आज सकाळपासून बँकेच्या गैर कारभारबाबत चर्चांना पेव फुटल्याने ठेवीदार बँकेच्या दारात गर्दी करू लागले आहे. जिल्ह्यातील अनेक शाखा त्यांच्या बंद आढळत असून साईरामचे मालक शाहिनाथ परभणे यांचा दूरध्वनी क्रमांक बंद लागत आहे. दरम्यान या प्रकारमुळे एकच गोंधळ उडालेला असून अद्याप या मागचे नेमकं कारण समोर आलेले नाही

# जालन्यात धनगर मोर्चाला हिंसक वळण, जिल्हाधिकारी कार्यालयावर दगडफेक

**धनगर समाजाला अनुसूचित जमाती आरक्षणाच्या अंमलबजावणी करण्यासह अन्य प्रमुख मागण्यांसाठी समस्त धनगर समाजाच्या वतीने काढण्यात आलेल्या मोर्च्याला जालन्यात हिंसक वळण लागल्याचे पाहायला मिळत आहे. या मोर्चा दरम्यान जिल्हाधिकारी निवेदन स्वीकारायला खाली आली नाहीत, त्यामुळे आंदोलन आक्रमक झाले. यावेळी आंदोलकांनी गेटवरून जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. तसेच यावेळी तुफान दगडफेक करण्यात आली आहे. त्यामुळे सध्या जिल्हाधिकारी परिसरात तणावाचे वातावरण असून, पोलिसांकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.**

धनगर समाजाला अनुसूचित जमाती आरक्षणाच्या अंमलबजावणी करण्यासह अन्य प्रमुख मागण्यांसाठी समस्त धनगर समाजाच्या वतीने आज सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. ज्यात, जिल्ह्यातील समस्त धनगर समाजाच्या वतीने हा मोर्चा काढण्यात येणार होता. हा मोर्चा गांधी चमन येथून सुरू होऊन शनि मंदिर, उड्डाणपुल, नुतन वसाहत, अंबड चौफुलीमार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. त्यानंतर मोर्चाचे रूपांतर सभेत झाले आणि नेत्यांचे भाषण झाले. भाषणानंतर काही लोकांनी जिल्हाधिकारी यांनी खाली येऊन निवेदन घेण्याची मागणी केली. पण, जिल्हाधिकारी खाली न आल्याने काही तरुण आक्रमक झाल्याचा आरोप केला जात आहे. तसेच, आक्रमक झालेल्या तरुणांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात घुसून तोडफोड करायला सुरवात केली. पाहता पाहता मोठा जमाव जिल्हाधिकारी कार्यालयात घुसल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

'या' आहेत मागण्या...

धनगर समाजाला अनुसूचित जमाती आरक्षणाची (एसटी) अंमलबजावणी करावी शहरातील अंबड चौफुली परिसरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास जागा उपलब्ध करून द्यावी जातनिहाय जनगणना करण्यात यावी

मेंढपाळांना शस्त्र परवाने द्यावे, मेंढ्यांना चरण्यासाठी वने राखीव ठेवावी शेळी मेंढी विकास महामंडळास दहा हजार कोटींचा निधी देण्यात यावा प्रत्येक जिल्ह्यात धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना मोफत वस्तीगृह उपलब्ध करून द्यावे आरक्षण लढयात शहीद झालेल्या समाजबांधवांच्या कुंटूबातील एकास शासकीय नोकरी द्यावी शासनामार्फत सवलतीच्या दरात कर्ज द्यावे सर्वच क्षेत्रातील खासगीकरण रद्द करावे आदी मागण्या नमुद करण्यात आल्या आहे.





## घटनास्थळी पोलिसांचा बंदोबस्त वाढवला...

जालना जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आलेल्या तोडफोड आणि दगडफेकीच्या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण पाहायला मिळत आहे. दरम्यान, मोर्चा असल्याने पोलिसांकडून आधीपासूनच पोलिसांचा बंदोबस्त तैनात होता. मात्र, आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचे कळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. तसेच जालना जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

# पोलिस अधीक्षकांच्या पथकाचा वाळू माफियांना दणका

### गोदावरी पात्रातील धाडीत पाऊण कोटींचा वाळू साठा जप्त





बीड । प्रतिनिधी

नंदकुमार ठाकूर हे बीडच्या पोलीस दलाला लाभलेले कुशल नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते विशेषता पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी आज सुद्धा दोन नंबर वाल्यांच्या विरोधात कंबर कसलेली आहे. वाळू महसूल विभागाच्या ताब्यात देण्यात येतं आहे.गणेश मुंडे यांनी मागच्या काही दिवसांपूर्वी वाळू माफियाविरोधात कारवाईची मोहीम हाती घेतली होती. यावेळी अनेक ठिकाणी छापेमारी करून कोट्यावधीचा साठा जप्त केला होता. यानंतर गणेश मुंडे यांच्यावर माफियानी भ्याड हल्ला केला होता. त्यानंतर काही काळ वाळूमाफियाविरोधातील मोहीम थंड पडली होती. मात्र आज पुन्हा एकदा म्हाळसा पिंपळगाव येथील

गोदावरी पात्रता छापा मारून २४०० ब्रास वाळू ज्याची साधारण किंमत जवळपास पाऊण कोटींच्या घरात असल्याची माहिती आहे. दरम्यान ही कारवाई गणेश मुंडे, श्री. वायबसे, स्वाती मुंडे यांच्यासह राखीव दलाच्या कर्मचाऱ्यांनी केली आहे..

पोलीस अधिक्षक पथक प्रमुख असलेल्या १ गणेश मुंडे व त्यांच्या न सहकाऱ्यांनी गेवराई न तालुक्यातील म्हाळसा पिंपळगाव येथील गोदावरी ह पात्रता छापा मारून जवळपास पाऊण कोटींचा वाळूसाठा जप्त केला. सदर कारवाई हि एपिआय गणेश मुढे व पथकातील अधिकारी कर्मचारी वायबसे स्वाती मुढे यांनी सह राखीव पोलीस दलातील कर्मचारी यांनी काढले तर श्री नंदकुमार ठाकूर यांनी कायद्याचा भडगाव करत या अगोदर सुद्धा वाळू माफियांना हरसुल कारागृहात रवांगी करत वि अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. यामध्ये नंगा नाच वाळू माफियांचा सुरूच आहे यामुळे माफी यांचे धाबे दणाणले असून गणेश मुंडे यांनी कारवाई करत वाळूमाफ यांचे कंबरटे मोडण्याचे काम केलेले आहे याबद्दल नंदकुमार ठाकूर पोलीस अधीक्षक यांचे पथक असलेले पदक प्रमुख गणेश मुंडे हे या अगोदर सुद्धा या कारवाईला सामोरे जात स्वतःच्या अंगावर संकट उडून घेत काम केलेले आहे गणेश मुंडे यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून वाळू माफियांना धडा शिकविण्यासाठी कंबर कसली असल्याचेही या ठिकाणी माफियांमध्ये बोलले जात आहे तरी माननीय नंदकुमार ठाकूर हे कर्तव्यदक्ष बीड जिल्ह्याला अभिमानास्पद लाभलेले बीडचे पोलीस अधीक्षक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे

# बीड बसस्थानकात चोरट्यांचं बस्तान

### शिक्षकाचं पाकिट मारलं, ८४ हजार रुपयांचा ऐवज लंपास

बीड : शिक्षक दाम्पत्य आपल्या मुलाला लातूर येथील शाळेत सोडण्यासाठी बसमधून जात असताना बसस्टँड ते शिवराज पान सेंटर या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी सदरील शिक्षकाचे पाकिट मारत खिशातून नगदी आठ हजार रुपयांसह पत्नीचे काढून ठेवलेले दागिने असा एकूण ८४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी अजित लोंढे या शिक्षकाच्या फिर्यादीवरून शिवाजी नगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेवराई तालुक्यातील कोळगाव येथील शिक्षक अजित नारायण लोंढे हे गेल्या काही दिवसांपासून आपल्या परिवारासह बीड शहरातल्या शिंदेनगर भागामध्ये राहतात, परवा दुपारी ते त्यांचा मुलगा लातूर येथे शिक्षण घेत असल्याने त्याला सोडण्यासाठी लातूरकडे निघाले, बीड बसस्थानकात आल्यानंतर त्यांनी बीड-लातूर या




एसटी बसमध्ये प्रवास सुरू केला, बसस्थानकापासून सदरची बस ही शिवराज पान सेंटरपर्यंत आली तेव्हा लोंढे यांना आपला खिसा मारल्याचे लक्षात आले. प्रवासाच्या दरम्यान त्यांनी त्यांच्या पत्नीचे मिनी गंठन, कानातील वेल, अंगठी असे सोन्याचे दागिने एका डब्बीमध्ये ठेवून स्वत:कडे घेतले होते. चोरट्यांनी त्या दागिन्यांसह नगदी आठ हजार रुपयांवर डल्ला मारला. तब्बल ८४ हजार रुपयांचा फटका संबंधित शिक्षकाला बसला. या प्रकरणी अजित लोंढे यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


### खा. प्रितमताई मुंडे यांनी केली

# रेल्वेस्थानकाची पाहणी दिलेलं वचन लवकर पुर्ण करणार

प्रतिनिधी। बीड

नगर-बीड-परळी रेल्वे प्रकल्पाच्या प्रगती अहवालाचा आढावा घेण्यासाठी खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांनी अंमळनेर (ता. पाटोदा) रेल्वे स्थानकाची 'स्पॉट पाहणी' केली. यावेही एकमेकांकडे बोट दाखवू नका असे म्हणत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. तसेच, परळीकडून तात्काळ काम सुरु करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी त्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला. रेल्वे विभाग आणि जिल्हा

प्रशासनाच्या तांत्रिक बाबी पूर्ण करताना एकमेकांकडे बोट दाखवून प्रकल्प रखडवू नका अशा शब्दात त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरलं. यावेळी प्रकल्पच्या अडचणी सोडवण्यासाठी उच्चस्तरीय बैठक लावण्यासाठी खा. प्रितमताई मुंडे



यांनी थेट केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना पाहणी स्थळावरूनच फोन केला. रेल्वे आणि इतर विभागांनी प्रकल्प वेळेत पूर्ण करावा याकरिता हिवाळी अधिवेशना दरम्यान दिल्लीस्थित कार्यालयात बैठक घेण्याचा विश्वास रावसाहेब दानवे यांनी दिला. लवकर मी दिलेल्या वचनांची पुर्ती करणार आहे असही खासदार डॉ प्रीतम ताई मुंडे यांनी सांगितले आहे.



# खोटा धनादेश दिला

### सुवर्णकारास ६ महिने कारीवासाची शिक्षा व ६ लाख नुकसान भरपाई

परळी : खोटा धनादेश दिल्याच्या आरोपावरून परळी येथील सुवर्णकारास परळी न्यायालयाने सहा महिने कारावास व ६ लाख रुपये नुकसान भरपाईची शिक्षा ठोठावली.थोडक्यात वृत असे की परळी येथील आरोपी सचिन किशनराव दहिवाळ (जिरेवाडीकर) यांनी व्यवसायसाठी

हातउसणे परळी येथील फिर्यादी दादाराव संभाजी मुंडे यांच्याकडुन दिनांक १३.०१. २०१३ रोजी २ लाख रुपये व पुन्हा दिनांक २२.०२.२०१३ रोजी रुपये २००००० हात उसणे घेतले होते. सदर रक्कमेच्या परतफेडीकरिता दिनांक.१५.०६.२०१५ रोजीचा रुपये ४००००० चा आय डी बी आय बँक शाखा परळी वैजनाथ या बँकेचा धनादेश दिला .सदर धनादेश न वटल्यामुळे फिर्यादी दादाराव संभाजी मुंडे यांनी परळी न्यायालयात कलम १३८ नि.ई.अँक्टखाली फिर्याद दाखल केली.प्रकरणाची सुनावणी परळी न्यायालय झाली. फिर्यादीचा युक्तीवाद मान्य करून आरोपी सचिन किशनराव दहिवाळ यास उपरोक्त ६ महिने कारावासाची शिक्षा ठोठावली.तसेच आरोपींने फिर्यादीस ६ लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी.नुकसान भरपाई नाही दिल्यास आरोपीला पुन्हा तीन महिना कारावास भोगावा लागणार आहे व सदर रक्कमेवर ९ टक्के दसादसे दराने व्याज द्यावे लागणार आहे दिले.फिर्यादीच्या वतीने अँड वंसतराव फड अँड.प्रविण फड यांनी काम पाहिले.

# शिवसेना आमदार अपात्रता सुनावणी

मुंबई : शिवसेना आमदार अपात्रताप्रकरणीसुनावणी सुरुवात झालीय. ठाकरे-शिंदे गटाच्या वकिलांच्या युक्तीवादादरम्यान खडाजंगी पाहायला मिळाली आहे. वकिलांच्या दोघांच्या वैयक्तिक टीका टिप्पणीवरून अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली आहे. व्यक्तिगत टीकाटिप्पणी करू नका, तुमचा मुद्दा कायदेशीररित्या मांडा, असे म्हणत शिंदे गटाचे वकील महेश जेठमलानी आणि ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत यांच्यातील वैयक्तिक टीका टिप्पणीवरअध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली.

शिंदे गटाकडून ज्येष्ठ वकील महेश जेठमलानी उपस्थित आहेत. २४ तारखेपर्यंत शिंदे गटाला वेळ देण्यात आलाय. कागदपत्र सादर करण्यासाठी हा वेळ देण्यात आलाय. ठाकरे गटाने आज कागदपत्रं सादर केली. शिंदे गटाने मात्र कागदपत्रं सादर करण्यास वेळ मागितला. ठाकरे गटाच्या वकिलांनी सुनील प्रभूंच्या साक्षीचं वाचन केलं. प्रभूंनी दिलेल्या साक्षीनुसार संबंधित कागदपत्रं ठाकरे गटाने सादर केली. ही साक्ष विधीमंडळाकडून टाईप केली जात आहे. त्यात कुठलीही चूक होऊ नये, म्हणून विधीमंडळाकडून सुरु असलेली टायपिंग दिसण्यासाठी एक मोठी स्क्रीन लावण्यात आली आहे

शिवसेनेत पडलेल्या फुटीवेळी पक्षाने पाठवलेल्या नोटीस, तत्कालीन वृत्तपत्रांची कात्रणे, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांचे आभार मानण्यासाठी केलेल्या पोस्ट हे सर्व पुरावे म्हणून ठाकरे गटाकडून सादर केले जात आहे. सर्व युक्तिवाद व आक्षेपाचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करावे, अशी मागणी ठाकरे गटाचे वकिल देवदत्त कामत यांनी केली. विधानसभा अध्यक्षांनी ही मागणी फेटाळली आहे. सर्व युक्तिवाद व आक्षेप हे रेकॉर्डवर घेतले जात असल्याचा निर्वाळा अध्यक्ष नार्वेकरांनी दिला आहे. शिंदे यांनी पुराव्यांवर घेतलेले आक्षेप इथेच नोंदवले जावेत ते बंद दारामागे होऊ नये आणि अध्यक्षांनी त्यावर काय रुलिंग दिलं ते सुद्धा रेकॉर्डवर घ्यावं, अशी देखील माहणी कामात यांनी केली आहे.

# बीडमध्ये जाळपोळ;जळगाव गाठणार्याला ठोकल्या बेड्या

बीड: बीड शहरात जाळपोळ, दगडफेक करून अभियांत्रिकीचे शिक्षण घेणार्या तरुणाने थेट जळगाव गाठले. २० दिवस झाल्याने आपल्याला कोणी पकडणार नाही म्हणून घरी आला. इकडे त्याच्या शोधात असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेने त्याला लागलीच बेड्या ठोकल्या. ही कारवाई सोमवारी रात्री १० वाजता बीड शहरात केली. याच्याकडून जाळपोळीतील इतर अनेक तरुणांची नावे उघड होण्याची शक्यता आहे.

निखिल रांजवण (वय २०, रा. शिंदेनगर, बीड) असे पकडलेल्या तरुणाचे नाव आहे. यानेच सुभाष रोड व जालना रोडवर दगडफेक करण्यास सर्वांत आगोदर सुरुवात केली. आंदोलनात निखिल हा आक्रमक होता. सीसीटीव्ही फुटेज व इतर पुराव्यावरून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याची रात्री उशिरापर्यंत स्थानिक गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू होती. ही कारवाई पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संतोष साबळे, उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, सुशांत सुतळे, मनोज वाघ, सोमनाथ गायकवाड, प्रसाद कदम व एलसीबी टीमने केली.



बीड शहरातील राजीव गांधी चौकात अग्निशमन दलाची गाडी जाळण्यात आली होती. ही गाडी जाळणाऱ्याचे नाव निखिलकडून उघड झाले आहे. हा गाडी जाळणारा आगोदरच पोलिसांच्या ताब्यात आहे. परंतु त्याने कबुली दिली नव्हती. आता आणखी आरोपींची नावे निखिलकडून उघड होणार असल्याचे सांगण्यात आले.

# भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी प्रदिप बांगर यांची नियुक्ती

## लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या कार्यकर्त्याचा खऱ्या अर्थाने सन्मान झाल्याची प्रदिप बांगर यांची प्रतिक्रिया




बीड (प्रतिनिधी) : भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे साहेब, लोकप्रिय नेत्या पंकजा ताईसाहेब मुंडे व खासदार प्रितम ताईसाहेब मुंडे यांच्या सूचनेनुसार भाजपा भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश अध्यक्ष राहुल भैय्या केंद्रे यांनी लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या तालमीत तयार झालेल्या प्रदिप बांगर यांची भाजपा भटके विमुक्त आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी नियुक्ती केली.

लोकनेत्या पंकजा ताईसाहेब मुंडे व लोकप्रिय खासदार प्रितम ताईसाहेब मुंडे यांच्यामुळे आज हा सोनेरी दिवस बघायला मिळाल्याची भावना प्रदिप बांगर यांनी व्यक्त केली. या नियुक्तीचे सर्व स्तरातून कौतुक होत असून मुंडे साहेबांच्या बोटाला धरुन राजकारणाचा श्रीगणेशा करणाऱ्या कार्यकर्त्याला आज भारतीय जनता पार्टीने न्याय दिल्याची भावना जनसामान्यातुन व्यक्त होताना दिसत आहे.

लोकनेत्या पंकजा ताईसाहेब मुंडे व लोकप्रिय खासदार प्रितम ताईसाहेब मुंडे यांचे कट्टर समर्थक म्हणून महाराष्ट्रभर परिचित असणारे प्रदिप बांगर यांच्या कार्याची दखल घेऊन पक्षाने या तरुण तडफदार नेतृत्वाला महाराष्ट्र भाजपच्या भटके विमुक्त आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी काम करण्याची संधी देऊन आजपर्यंत पक्षासाठी व मुंडे घराण्यासाठी केलेल्या कामाची पोहच पावती दिली आहे. या आगोदर ते भाजपा विद्यार्थी आघाडीचे प्रदेश संघटक म्हणून कार्यरत होते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नासाठी सदैव अग्रेसर राहून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर काम केलेले आहे.

प्रदिप बांगर यांना नियुक्ती पत्र देण्याचा कार्यक्रम रविवारी भाजपाचे लोकप्रिय जिल्हा अध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांच्या कार्यालयात मोठया उत्साहात पार पडला. या सोहळयासाठी भाजपाचे भटके विमुक्त आघाडीचे लोकप्रिय प्रदेश अध्यक्ष राहुल भैय्या केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच भाजपचे जिल्हा अध्यक्ष राजेंद्रजी मस्के, अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष सलीम जहांगीर, नवनाथ आण्णा शिराळे, भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश सरचिटणीस प्रा.पी.टी. चव्हाण, युवा नेते सुनील मिसाळ, डॉ. लक्ष्मण जाधव, भूषण पवार यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

प्रदिपजी बांगर यांच्या निवडी बद्दल त्यांचे लोकप्रिय लोकनेत्या पंकजा ताईसाहेब मुंडे, खासदार प्रितम ताईसाहेब मुंडे, माजी आमदार गोविंद अण्णा केंद्रे, आमदार नमिताताई मुंदडा, आमदार श्रीकांतजी भारतीय, आमदार अभिमन्यु पवार, आमदार राम सातपुते, आमदार राणा जगजितसिंह पाटील, आमदार सुरेश अण्णा धस, आमदार लक्ष्मण पवार, सर्जेराव तात्या तांदळे, निळकंठ चाटे या सर्वांनी अभिनंदन केले.

# मोदी आवास योजनेचे जिल्ह्याला १६ हजार घरकुलांचे टार्गेट

## ३१ मार्चच्या आत या घरकुलला मंजुरी देण्याचे सरकारचे सीईओंना आदेश

बीड : ओबीसी प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी या वर्षी नव्याने मोदी आवास योजना सुरू करण्यात आली असून बीड जिल्ह्याला १५९६३ घरकुलांचे टार्गेट दिलेले आहे. ही योजना जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेअंतर्गत राबवायची असून ३१ मार्च २०२४ च्या आत या घरकुलांना मंजुरी देऊन त्यांना बांधकाम करण्याचे आदेश सीईओंनी द्यावेत, असेही सरकारच्या आदेशात म्हटले आहे.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील यांनीही राज्य सरकारच्या या आदेशासोबत लागोलाग बीड जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांना उद्दिष्टानुसार टार्गेट वाटप केलेले आहे. त्याअनुषंगाने अंबाजोगार्स १५६०, आष्टी १३०५, बीड १३५८, धारूर ११३८, गेवराई २३४०, केज २१४२, माजलगाव १४३३, परळी १९५४, पाटोदा ६२२, शिरूर कासार १५२९, वडवणी ५५४ असे एकूण बीड जिल्ह्याला ३१ मार्च २०२४ च्या आत १५९३६ घरकुले बांधकाम करावयाचे आहेत. याबाबत तालुक्यातील ओबीसी घटकातील लाभार्थ्यांचे प्रस्ताव ग्रामपंचायतकडून मागवून पंचायत समिती यांच्याकडू बीड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला प्राप्त करून घ्यावयाचे आहेत. ओबीसी घटकातील धनगर, माळी, गोसावी, वंजारी आदी वर्गातील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ होणार आहे, असेही जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील आणि घरकुल योजनेचे सोळंके यांनी म्हटले आहे.



परळी / विकास वाघमारे

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे युवानेते तथा आ. रोहित पवार दादा यांची गेली चार दिवसापासून महाराष्ट्रामध्ये युवा संघर्ष यात्रा सुरू आहे ती यात्रा आज बीड जिल्ह्यात डेरे दाखल झाल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या ज्येष्ठनेत्या सौ सुदामतीताई गुट्टे यांनी या यात्रेमध्ये सहभाग नोंदवला आहे. दरम्यान आमदार रोहित पवार यांचे सौ गुट्टे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.युवक,शेतकरी ,सामान्य जनतेच्या अडचणी समोरील आव्हाने शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी खा शरद पवार यांच्या गटाचे आ. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या युवा संघर्ष यात्रेचे बीड जिल्ह्यात जोरदार स्वागत करण्यात आले नवगण राजुरी येथील मंगलमूर्ती देवस्थान येथे दर्शन घेऊन हे यात्रा निघाली या यात्रेत बीड जिल्ह्यातील शेकडो नागरिक कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



मराठवाड्याला हक्काचे पाणी त्या यासाठी संभाजीनगर येथे संघर्ष लढायासाठी जन आंदोलन होत आहे यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे गेवराई विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांसह सहभागी झाले आहेत

# हक्काच्या पाण्यासाठी अमरसिंह पंडित यांचा सिंचन भवनासमोर ठिय्या

## मराठवाड्यातील सर्व पक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत जन आंदोलन





छ.संभाजीनगर (प्रतिनिधी)

समन्यायी तत्वावर जायकवाडी धरणात ८.६ टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश होवूनही केवळ अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील नेत्यांच्या राजकीय दबावामुळे अद्याप जायकवाडी मध्ये पाणी सोडले नाही. त्यामुळे मराठवाड्यातील विशेषतः लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना आहे. मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळावे या मागणीसाठी सर्व पक्षीय नेत्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील सिंचन भवनासमोर ठिय्या आंदोलन केले. जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी आजच पाणी सोडले पाहिजे या मागणीला ठाम राहत शेवटपर्यंत महामार्गावर ठिय्या दिला, शेवटी अमरसिंह पंडित यांच्यासह आ.राजेश टोपे, अनिल पटेल व इतरांना पोलिसांनी अटक केली. रस्त्यावरील लढाई बरोबरच सुप्रिम कोर्टातही हक्काच्या पाण्यासाठी लढा देणार असल्याचे अमरसिंह पंडित यांनी सांगितले. दोन दिवसांत जायकवाडी पाणी सोडणार असल्याचे आश्वासन जलसंपदा अधिकाऱ्यांनी दिले.

जन आंदोलनात सक्रीय सहभाग नोंदवत जय भवानीचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी प्रचंड घोषणाबाजी करत पाणी सोडण्याला विरोध करणाऱ्यांच्या नावाने बोंब ठोकली. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, सरकार नगर आणि नाशिक जिल्ह्यातील नेत्यांच्या दबावाला बळी पडत आहे, मराठवाड्यातील आमदारांनी शासनाला या बाबत जाब विचारणे गरजेचे आहे. पाणी सोडण्यास विलंब झाल्यास पाण्याचा मोठा अपव्यय होणार आहे. यापूर्वी ज्या-ज्या वेळी नगर आणि नाशिक जिल्ह्यातील नेत्यांनी पाणी सोडण्यास विरोध केला, त्या-त्या वेळी आपण त्यांना विरोध केल्याचे सांगताना उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात सुध्दा त्यांना आवाहन दिले आहे. आताही रस्त्यावर उतरून शेतकऱ्यांच्या हितासाठी शेवटपर्यंत लढणार असून रस्त्यावरील लढाईबरोबरच न्यायालयीन लढाई सुध्दा लढणार असल्याचे सांगताना शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून उद्या सुप्रिम कोर्टातील याचिकेत आपण सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मध्य गोदावरी खोऱ्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून मराठवाड्याच्या धरणांमधील पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायद्यातील तरतुदीनुसार समन्यायी तत्वावर पाण्याचे नियमन करून अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील धरणांतील पाण्याच्या टक्केवारी इतकी पातळी जायकवाडी धरणातही निर्माण व्हावी यासाठी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी वेगवेगळ्या पातळीवर आजवर लढा दिला आहे. सोमवार, दि.२० नोव्हेंबर रोजी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा पाणी जनआंदोलन समितीच्यावतीने भव्य जनआंदोलन करण्यात आले. यावेळी मराठवाड्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी एकजुट दाखविली. सिंचन भवनासमोर रस्ता रोको आंदोलन करताना अमरसिंह पंडित यांनी शेवटपर्यंत रस्त्यावर ठिय्या दिला. या आंदोलनात गेवराई तालुक्यातील विशेषतः गोदावरी पट्ट्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आंदोलन स्थळी सुरुवातीपासून शेवटपर्यंत शेतकऱ्यांबरोबर रस्त्यावर थांबणारा अमरसिंह पंडित हा एकमेव नेता होता. आजच पाणी सोडले पाहिजे या मागणीवर ते ठाम होते, शेवटी छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. शहरातील सातारा पोलिस ठाण्यात त्यांना अटक करून सोडून देण्यात आले. पोलिस बळाच्या अतिरेकी वापराबाबत उपस्थितांनी प्रचंड घोषणाबाजी करून निषेध केला.



मराठवाड्यातील हाक्काचे पाणी मिळावे यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित आंदोलनात गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच उपस्थिती होती




गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील बेलगुडवाडी येथील श्री.दुर्गेश बाबुराव माने यांच्या कल्पनेतून व बेलगुडवाडी गावक-यांच्या सहकार्यातुन ग्रामीण भागातील तरूणांना प्रोत्साहन मिळावे सैन्यभरती,पोलीस भरती व देशाभिमान निर्माण व्हावा म्हणून शाहिद जवान ह्रदयनाथ बाबुराव माने यांच्या स्मरणार्थ ठाकर आडगांव रोड,बेलगुडवाडी फाटा यथे स्वागत कमानिचे उद्घाटन बेलगुडवाडी व ठाकर आडगांव येथील जेष्ठ नागरिकांच्या हास्ते संपन्न झाले,या प्रसंगी मुरलीधरराव पवार,प्रल्हाद पवार,ज्ञानदेव पवार,बाबुराव कोकाट, आच्युतराव चव्हाण, डॉ,सचिन पवार,सतिष पवार,प्रल्हाद पांचाळ,सोनाजी पवार,रवि पवार, गणेश शिंदे,सभाजी पवार,नंदकुमार पवार, प्रभाकर वारंगे,पांडुरंग गाढे,हणूमान काळे,आन्साराम,घाडगे,मधुकर गाठे,रामा नरवडे,किसन माने, शिवाजी सोनवणे,दिलीप जाधव,शरद पवार, आमोल पवार, बाळासाहेब आंबड,तुकाराम पवार, आशोक आंबाड,ल्लू पवार,बेलगुडे पाटील, सरपंच भागवत जाधव, बळीराम माने व बेलगुडवाडी व ठाकर आडगांव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




साखळी उपोषण गुंधा.मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ सुदर्शन दादा मोरे यांचे ६ दिवसाचे आमरण उपोषण मागे घेतल्यानंतर... आज गुंधा येथील चालू असलेला मराठा आरक्षण साखळी उपोषणाचा २१ वा दिवस चालू असून,आपल्या गावातील ज्येष्ठ नागरिक, व ओ.बी.सी.समाज बांधवांच्या वतीने बाबासाहेब अश्रूबा डोळस यांनी मराठा समाजाच्या बांधवांना पाठिंबा देण्यासाठी यांचे २४ तासाचे उपोषण संपन्न झाले... यावेळी बाबासाहेब अण्णा यांच्या समवेत सर्व ब्राम्हणाथ तरुण मित्र मंडळ उपस्थित होते...धन्यवाद आपले वयाच्या ७६ व्या वर्षी मराठा समाजासाठी योगदान देण्याचा योगदान लाभले.व अशीच समाज सेवा आपल्या हातून घडत राहो. हीच ईश्वर चरणी प्रार्थना...सकल मराठा समाज बांधव गुंधा..



रोहीत दादा पवार यांची माजी जिल्हा परीषद सदस्य मदनरावजी चव्हाण ( भाऊ ) यांना सदीच्छा भेट.

## द केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कूल गेवराई, स्कूलच्या

# कु.जोया रफिक शेख ह्या विद्यार्थीनीची राज्य फुटबॉल संघात निवड

गेवराई : गेवराई तालुक्यातील द केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कूल गेवराई, या सीबीएसई माध्यम स्कूलची विद्यार्थिनी कु. जोया रफिक शेख हीची १४ वर्षाखालील मुलींच्या महाराष्ट्र संघा मध्ये बीड जिल्ह्यातून निवड झालेली एकमेव विद्यार्थिनी आहे.कोल्हापूर पन्हाळा येथे ६ ते ९ नोव्हेंबर दरम्यान झालेल्या चाचणी स्पर्धेत कु. जोया रफिक शेख ही सहभागी झाली होती आणि त्यात उत्तम कामगिरी करत तिने बाजी मारली आणि महाराष्ट्र संघात स्वतःचे स्थान पक्के केले.



वाडिगोद्री सारख्या मध्यम ग्रामीण भागामधून कु. जोया रफिक शेख हिने तीन महिन्याच्या कठोर परिश्रमातून हे यश मिळवले. अंकुश नगर रहिवासी असल्या मुळे याची दखल घेत माजी राज्य मंत्री श्री.राजेश भैय्या टोपे साहेब यांनी जोया व तिच्या पालक यांचा कौतुक व सत्कार केला. तिने याचे श्रेय तिचे शाळेतील क्रीडा शिक्षक घोरतळे सर, इंगळे सर, कादे सर आणि पालक जे स्वतःही क्रीडा शिक्षक आहेत असे श्री. रफिक शेख सर यांना दिले. तिने आज १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या महाराष्ट्र संघाच्या निवड चाचणीसाठी बीड जिल्हा विभागामधून उपस्थिती दर्शवत संघात स्थान मिळविले. तालुक्यात निवड होणारी कु. जोया रफिक शेख ही एकमेव असून; तिचे सर्व स्तरावर कौतुक होत आहे.याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.बी.आर.मोटे, डॉ. वर्षा मोटे , श्री जमादार शेख सर,प्राचार्या किरण कुंडू, क्रीडा शिक्षक आणि समस्त आधार फाउंडेशन परिवार व पालक यांनी कौतुक करत तिला शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे पुढील वाटचाली साठी नेहमी सहकार्य राहील असे ही सांगितले..

# वसंतराव नाईक तांडा सुधार समितीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पप्पू चव्हाण यांनी स्वीकारला पदभार

## बीड जिल्हा बंजारा समाज यांच्या वतीने सत्कार

बीड (प्रतिनिधी) :- माजी मंत्री पंकजाताईं मुंडे व खा. डॉ. प्रिंतमताई मुंडे यांचे विश्वासू परळी तालुक्यातील कौठळी येथील बाळासाहेब उर्फ पप्पू चव्हाण यांची वसंतराव नाईक तांडा सुधार समितीच्या जिल्हाध्यक्ष म्हणून शासनाने नुकतीच नियुक्ती केली आहे. वसंतराव नाईक तांडा सुधार समितीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पप्पू चव्हाण यांनी पदभार स्वीकारला व कामकाज बाबत माहिती समजून घेतली. तसेच समाजकल्याण सहाय्यक आयुक्त श्री शिंदे यांनी पदभार देऊन सत्कार करण्यात आला. दरम्यान बीड जिल्हा बंजारा समाज यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. दरम्यान,माजी मंत्री पंकजाताईं मुंडे व खा. डॉ. प्रिंतमताई मुंडे यांनी माझ्यावर जो विश्वास टाकून जबाबदारी दिली तो विश्वास जन सामान्यांची कामे करून सार्थ करून दाखवू असे चव्हाण यांनी म्हटले आहे.

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या अंतर्गत हाती घ्यावयाची कामे जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखालील समितीस सुचविण्याकरिता बंजारा बहुल जिल्ह्यासाठी स्थापन करावयाच्या समितीच्या अध्यक्षपदी बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यातील कौठळीचे भाजपाचे युवा कार्यकर्ते बाळासाहेब भाऊराव चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली असून तसे आदेश शासनाच्या वतीने निर्गमित करण्यात आले. बीड जिल्हा समाज कल्याण कार्यालय येथे वसंतराव नाईक तांडा सुधार समितीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पप्पू चव्हाण यांनी स्वीकारला पदभार घेतला तसेच कामकाज समजून घेतले.त्यांचा समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिंदे साहेब यांनी पदभार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यालयात अधिकारी, कर्मचारी यानी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. दरम्यान, पंकजाताई मुंडे व खा.



डॉ. प्रतिमताई मुंडे यांनी माझ्यावर एवढी मोठी जबाबदारी टाकली. जो विश्वास टाकून जबाबदारी दिली तो विश्वास जन सामान्यांची कामे करून सार्थ करून दाखवू असे चव्हाण यांनी म्हटले आहे. पंकजाताई मुंडे व खा. डॉ. प्रतिमताई मुंडे यांचा विश्वास सार्थ करून दाखवू असे ते म्हणाले. हे पद माझ्यासाठी खुप महत्वाचे आहे. पदाला न्याय देण्यासाठी मी वचनबद्ध आहे.

दरम्यान महाराष्ट्र शासनाने वसंतराव नाईक तांडा सुधार व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना समितीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी बाळासाहेब (पप्पु) चव्हाण यांची नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. बंजारा समाजातील युवा कार्यकर्त्यांला बंजारा समाजातील सर्वसामान्य लोकांची सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल अतिशय नम्र, जिद्द ,चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर वरिष्ठांचा शब्द हा प्रमाण म्हणून काम करणार एक सर्वसामान्य कार्यकर्ता, वरिष्ठांच्या विश्वासास् पात्र ठरला असून या भविष्यात यशाबद्दल मिळालेल्या पदाचा भविष्यात त्याच्या हातून बंजारा समाजाची कायम चांगली सेवा घडो. यासाठी सकल बंजारा समाज बीड यांच्यावतीने बाळासाहेब (पप्पु) चव्हाण यांचा बीड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सोमवारी (ता.२०) भव्य सत्कार सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सत्कार सोहळ्यास बीड जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक ,सांस्कृतिक क्षेत्रातील युवा, तरुण, युवा कार्यकर्ते , ज्येष्ठ नागरिक ,महिला भगिनी, अधिकारी, कर्मचारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.



## शैलेंद्र पोटभरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना विविध मागण्याचे निवेदन सादर

बीड ।प्रतिनिधी

रिपाई एकतावादी बीड जिल्हा कमिटीच्या वतीने शैलेंद्र पोटभरे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन ठेवण्यात आले आहे करीता मागण्या खालील प्रमाणे आहेत. कसत असलेल्या गायराण जमीनी गायरानधारकाच्या नावे करण्यात यावे.भोगवटदाराच्या नावे मालकी पि.टी.आर. करण्यात यावा.रमाई व पंतप्रधान घरकुल योजनेचा निधी ५ लक्ष रुपये करण्यात यावा. घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळु देण्यात यावी. प्रलंबीत स्वधार व शिष्यवर्ती त्वरीत विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात करा. अनुसूचीत जाती जमातीच्या भुमीहिनांना शासकीय जमीन उपलब्ध करुन सरसकट ५ एकर देण्यात यावी.अनुसूचीत जाती जमाती स्वतंत्र बजेट कायदा करण्यात यावा. मागासवर्गीय समाजावर अन्याय अत्याचार वाढला असुन त्यावर सरकारने कठोर कार्यवाही करण्यात यावी व अट्रासिटी ॲक्टचा निधी तात्काळ अन्याय ग्रस्त धारकाच्या नावे वर्ग करावा.

उसतोड मजुर यांना प्रति टन ५०० रु. भाव देण्यात यावा.पशुसंवर्धन व शेळी मेंढी पालन यांचा निधी वाढवुन देण्यात यावा व ड्रॉ पध्दत बंद करा व अनुसूचीत जाती जमातीला सरसकट लाभ देण्यात यावा. श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेचा निधी वाढवुन महिन्याच्या महिन्या लाभ धारकाच्या खात्यात वर्ग करण्यात यावा. जातीय जनगनना करुन आरक्षणामध्ये वाढ करण्यात यावी.अनुसूचीत जाती जमातीचा निधी इतर खर्च न करता त्याच विभागात खर्च करण्यात यावा. नौकर भरती करुन मागास्वर्गीयांना आरक्षाण द्यावे. महात्माफुले विकास महामंडळाचे सर्व विभागाची कर्ज माफ करण्यात यावे. विविध प्रश्न घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे व पदाधिकारी कार्यकर्ते त्यामध्ये महिला जिल्हाध्यक्षा सीताताई थोरात, जिल्हा उपाध्यक्ष डी.ए. जिल्हा उपाध्यक्ष डी एस. तूपसमुद्रे, परळी तालुका अध्यक्ष संजय भद्रे धारूर तालुका अध्यक्ष महेश शिरसाठ सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण शिंदे सामाजिक कार्यकर्ते माणिक बनसोडे, रिपाई कार्यकर्ते महिला बहुसंख्येने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

# गरज पाण्याची

**सर,मी रोज सकाळी उठताच १ लिटर कोमट पाणी पिते. जास्त पाणी पिणे चांगले असते ना ?सर, माझे आजोबा जेवण होताच एक तांब्या पाणी पितात .सर,रोज मी ४ ते ५ लिटर पाणी पितेच.मी खूप व्यायाम करतो ना ! मग लगेच गटागट पाणी पितो.मी रोज झोपण्यापूर्वी १ ग्लास पाणी पितेच.असे एक ना अनेक रुग्ण येतात आणि मी किती पाणी पितोय याची जणू स्पर्धाच चालू आहे त्याप्रमाणे आकडे सांगतात.**

**कुणी सांगितले असे मी विचारताच ,अमुक एक बाबा सांगतात ना ? मित्राने सांगितले ,,हर्रींीं वर वाचले.माझे काका म्हणतात इ .इ.सांगतात . खूप पाणी पिणे चांगले असते ना ?पण मी त्यांना आयुर्वेदात असे सांगितले नाही असे सांगताच त्यांना आश्चर्य वाटते .**

आयुर्वेद हा प्रत्येक व्यक्तीला त्याचे लिंग,प्रकृती, वय,आजार,ऋतू,देश, बल,गरज यानुसार सल्ला देतो. आयुर्वेदाचे नियम सूत्ररूप असून , ती प्रत्येक अवस्थेनुसार बदलत जातात.ज्यांना कफ,सर्दी,स्थूलता आहे त्यांनी सकाळी जास्त पाणी पिवू नये.ज्यांना भूक लागत नाही ,आंबट पाणी ,उलटी होते त्यांनी गरजेनुसार पाणी प्यावे .जेवणाप्रूवी नंतर कोणी किती पाणी प्यावे याचे नियम आहेत त्यामुळे सगळ्यांना एकच सल्ला देता येणार नाही.

कुठे पाण्याची जास्त गरज असेल कुठे कमी.कुठे पाणी पिवूच नका असा सल्ला (जलोदर ,-ीलळींळी मध्ये) दिला जातो.कुठे गरम पाणी प्या (सर्दी, घसादुखणे,दमा इ)कुठे थंड पाणी प्या गरम नको ( दाह,उष्मा,घाम जास्त येणे)कुठे गरम पाणी थंड करून प्या (जुलाब, पोट दुखी इ)सांगितले जाते .हे सर्व सांगण्याचे प्रयोजन आहे.सायन्स मासिकात २३ देशातील लोकांमध्ये संशोधन करून जो निष्कर्ष काढला आहे तो आणि आयुर्वेदातील सिद्धांत हे मिळते जुळते आहेत. प्रत्येक माणसां मध्ये पाण्याची गरज वेगवेगळी असते असा तो निष्कर्ष .तुम्ही जिथे राहता तो प्रदेश ,तेथील हवामान ,तापमान,उंची,आद्रता आणि इतर घटकावर पाण्याच्या पिण्याचे प्रमाण बदलत जाते.

आयुर्वेदानुसार जठराचे चार कप्पे सांगून त्यात दोन भाग घन पदार्थ,एक भाग पाणी आणि एक भाग हवे साठी रिकामा ठेवण्यास सांगितले आहे .याने अन्नाचे पचन चांगले होते. अम्लपित्त,गॅसेस,लेपीींळरिींळेप इ आजारांवर या घटकांचा परिणाम होते. तहानेच्या मात्रेत पाणी पिणे .भूक लागल्यावर पाणी न पिणे.

थकवा जास्त असेल तेव्हा पाणी पिणे. रात्री लघवीला वारंवार जात असाल तर पाणी मात्रेत पिणे.उष्णता जास्त जाणवत असेल तर पाणी थोडे जास्त पिणे. असे प्रत्येक अवस्थे नुसार पाण्याचे नियम बदलत जातात. नवनवीन संशोधन येत आहेत जास्त पाणी पिण्याचे फायदे कमी आणि नुकसान जास्त दिसत आहेत.याचा अर्थ पाणी पिवु नये किंवा कमीच प्यावे असा गैर समज कुणी करू नये.

पाणी हे जीवन आहे आणि त्याच पाण्यात कुणी पडला तर तेच मरणाचे कारण ठरते. मग आता करायचं तरी काय ???तेव्हा पाण्याबद्दल एकच करायचे

ना कम ना ज्यादा
जिसको जैसा लगे
बस वैसा ही पिना
आयुर्वेद की सूनना
सो साल जिना

डॉ.अमोल देवरे
श्री मेहेरविश्व
आयुर्वेद पंचकर्म क्लिनिक

**–छत्रपती संभाजीनगर**



माजी नगरसेवक मरहुम हाजी आबेद मीया कुरेशी यांनी अनेक वर्षी आपल्या कार्यकाळात मोमीन पुरा कुरेशी मोहल्ला येथील जनतेची मनोभावे सेवा केली त्याच प्रकारे आमचे वडील मरहुंम जावेद मीया कुरेशी यांनी देखील त्यांच्या कार्यात कोणतीच कमी कधी ही पडू दिली नाही आता तोच वारसा आणि वसा पुढे घेवून जात असताना जनसेवा करत असताना पुढे घेवून जात आहे ,

गेल्या अनेक दिवसांपासून कुरेशी मोहल्ला आणि आजूबाजूचा परिसर या भागात पाण्याच्या पाईप लाईन चा प्रश्न प्रलंबित होता आज आदरणीय जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या माध्यमातून त्या पाईप लाईन च्या कामाला सूरवात झालेली आहे या ठिकाणी उभे राहून काम करून घेत असताना वाजेद भैय्या कुरेशी.

# बदल

आज मी जे मांडणार आहे ते सगळ्यांनाच पटेल असे नाही....आज दिवसभरातल्या अनेक घटनांनी मन सुन्न झालं आणि अनेक प्रश्न सतत मनात फिरायला लागले ...विषय आहे स्त्री ....रोजचाच ...पण आज स्वतः त्या प्रश्नांना आपण म्हणून विचार केला... घर सांभाळणारी,नोकरी करणारी कोणतीही स्त्री असो, प्रत्येक वेळी स्वतःच अस्तित्व जपण्यासाठी तिची मरमर..त्यातल्या त्यात नोकरी करणारी..समाज म्हणत जरी असला तरी त्यांनी तिला अजून पुढारलेली ,गुणवान म्हणून स्वीकारलेले नाही . नोकरी करणारी स्त्री ...स्वतःला हुशार समजणारी, स्वतःच्या पायावर उभी,मोठ्ठा पगार घेणारी, मन मानेल तस वागणारी अशी हिच्या विषयी समाजाची भूमिका...अहंकारी, मनमौज करणारी अशी अनेक लेबल मिळालेली... आज हिचा पगार दिसतो पण हिच्या नोकरीच्या ठिकाणाचा हीचा त्रास दिसतो का समाजाला ? हिनी केलेले कष्ट दिसतात का? आपण वृत्तपत्रात नेहमीच तिच्या या त्रासा बद्दल वाचतो पण खरोखर विचार करतो का?पण विचार करणं गरजेचं ठरले आहे ,आज ती सुरक्षित नाही, ती जे काम प्रामाणिकपणे करते त्याच फळ तिला मिळतं का ?याचा विचार केला तर फळ तर कमीच पण अवहेलनाच जास्त .प्रत्यक्ष पाहिलं तर उत्तर नाहीच येते. तिच्यातल्या गुणांना कायमच दुर्लक्षित केलं जातं ,तिथे होणाऱ्या राजकारणाची ती कळत नकळत बळी ठरते .तिच्या यशाचे कौतुक करणारे तर बोटावर मोजणारेच,तिच्या आनंदात सहभागी होणारे तर नाहीच . तिच्या समोर चांगुलपणाचे मुखवटे लावून फिरणारे, सतत तिला स्वतःला सिद्ध करायला लावणारे , वाईट वर्तन करणारे. अशाच सगळ्यां मध्ये कधी नाईलाज तर कधी स्वतःतले गुण सिद्ध करण्यासाठी ती काना डोळा करत प्रवास करत रहाते,या प्रवासात सतत तिला निहाळणार्या वाईट नजरा, तिची अवहेलना करणारे हे सगळं ती सहन करत रहाते का तर समाज तिलाच वाईट म्हणेल या भीतीने ,सतत दडपणाखाली आपलं काम प्रामाणिक पणे करत रहाते आणि उरल्या सुरल्या आपण मैत्रिणी तिला टोमणे द्यायला आहोतच ,हेवे दावे हे सगळे एका मर्यादेपर्यंत पण आपल्या मैत्रिणीच्या अस्तित्वाचा ,तिच्या सन्मानाचा प्रश्न येतो तेव्हा आपला आधार मोठ्ठा असलाच पाहिजे आपणच सगळ्यात जास्त नको ती लेबल लावत बसतो ,समाजाचा सगळाच घटक असा आहे असं मी म्हणत नाही मग जे यात मोडत नाहीत ज्यांना या सगळ्या गोष्टी कळतात , सत्य माहीत असते तर बघ्याची भूमिका का ?स्त्रीच्या सन्मानाची,चारित्र्याची गोष्ट आली की कुठेतरी सत्याची बाजू घेणं गरजेचं आहे. इतरांन प्रमाणे तिलाही सन्मान द्या आणि खर म्हणजे माझ्या मैत्रिणींनो आपणच आपल्याला सन्मान दिला तर दुसरे देतील ,तुम्ही बरोबर असाल,तुमच्यावर अन्याय होत असेल तर कुठेतरी आवाज उठवणे गरजेचे आहे ....आपणच बदल करायला हवा..तर आता जाग्या होऊयात आणि आपले भविष्य आपणच उज्वल करूयात....

**–रुपाली पाटील...**

# माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांचे शिवणी काठोडा शेतातच लक्षवेधी आमरण उपोषण सुरु

बीड ।प्रतिनिधी

जो जमीन सरकारी व जमीन हमारी है शिवनी काठोडा येथील माजी सैनिक देश सेवा करून आल्यानंतर बारा वर्षापासून सर्वे नंबर ६६२ तीला गायरान जमीन कसंत आहेत. या ठिकाणची जमीन ही माळराना वर आहे, त्यांनी स्वतःच्या कष्टाने कमवलेल्या पैशातून जेसीबी लावून ही जमीन पिक घेण्यासाठी कष्ट करून वहीतील आणली व त्याच शेतामध्येच त्यांनी राहण्यासाठी एक पत्राचे घर बांधले. त्यामध्ये संसार उपयोगी साहित्य तसेच शेतीला उपयोगात असणारे सर्व अवजारे खत बी बियाणे व उपजीविका भागवण्यासाठी लागणारे अन्नधान्य देखील होते. एके दिवशी अचानक शेतात बांधलेल्या घरत चोरी झाली. व ते घर तोडण्यात आले त्याचे निघालेले साहित्य त्यामध्ये अँगल पत्रे व सिमेंट होते संसार उपयोगी साहित्य दिवसाढवळ्या त्या ठिकाणाहून चोरून नेले याची तक्रार त्यांनी त्याच दिवशी पिंपळनेर पोलीस ठाण्यात केली होती अद्याप त्यावर कारवाई नाही.

जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी लक्षवेधी आमरण उपोषण शिवनी शेत शिवारात सुरू केले आहे. उपोषणाला जवळपास पाच दिवस पूर्ण होत आहेत. या अगोदर अनेक वेळा जिल्हा कचेरी कार्यालयासमोर त्यांनी आमरण उपोषण आंदोलने केली आहेत. या उपोषण




शिवनी येथील गायरान शेतात पाचव्या दिवशीही लक्षवेधी आमरण उपोषण सुरू

आदलाची अद्याप कुठल्याही प्रशासकीय अधिकाऱ्याने व राजकीय नेत्यांनी घेतली नाही. देश सेवा केलेल्या माजी सैनिकाची अशी ही परवड होत आहे.

बीड जिल्ह्यातील राजकीय नेत्यांच्या अनेक भ्रष्टाचाराचे प्रकरणे त्यांनी हाताळले आहेत. बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलने करून लक्ष घालण्यास प्रशासनाला भाग पाडले आहे. याचा राजकीय नेत्यांना व प्रशासनाला चांगलाच त्रास सहन करावा लागला होता. याचाच कुठेतरी बदला प्रशासन व राजकीय नेते घेता आहे असा आरोप त्यांनी केला आहे.

प्रशासनाने तात्काळ सदरील गायरान जमिनीवर शासनाच्या नियमाप्रमाणे नाव नोंद करून तात्काळ गायरान जमीन यांच्या नावे करावी अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे. व त्यांच्यावर अन्याय अत्याचार करणाऱ्या व्यक्तीवर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. आमरण उपोषणाचा पाचवा दिवस सुरू अद्याप पर्यंत प्रशासनाचे दुर्लक्ष.



पिंपरी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम २०२३ अंतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्नित असलेल्या कृषी महाविद्यालय कोंघारा येथील विद्यार्थी शामली शेडमाके, काजल बोढे , प्रति चवले, संजना बुचचे या कृषीदुतांनी पिंपरी येथे खतांमध्ये युरिया, डीएपी, एमओपी, एनपीके कॉम्प्लेक्स, एसएसपी, झिंक सल्फेट, कॉपर सल्फेट यांचा समावेश यांची भेसळ शोधण्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले हा उपक्रम कृषी महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी मा. प्रा, संकेत येलोरे सर आणि विषय तज्ञ मा. प्रा. उत्कर्षा ढेंबरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.=ऋ=ज

# वन्य पशु-पक्षांवरील उपचार व छायाचित्र छंदामुळे इशा लांडे स्पर्धेत अव्वल ठरली -प्रमोद छाजेड



## स्नेह ७५ च्या वतीने प्रोत्साहन -प्रेरणा देण्यासाठी सन्मान

शिरुरकासार(प्रशांत बाफना)

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या हातात कला, कौशल्य काही तरी वेगळे करुन दाखविण्याचे गुण असतात, त्या गुणांना योग्य दिशा दाखविली तर त्याचा विकास होतो. वन्य पशु-पक्षांवर प्रेम करुन त्यांच्या विषयी असणारे प्रेम, दया, भावना इशा लांडे दाखवत असल्याने वन्यजीवांचे उत्कृष्ट छायाचित्रे काढू शकली. पशु-पक्षांची छायाचित्रे काढण्याच्या छंदामुळे कॅनन इंडिया वाईल्ड व्हिजन्स आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून अव्वल ठरली, याचा सर्वांनाच अभिमान आहे, असे प्रतिपादन एलआयसीचे प्रतिनिधी प्रमोदकुमार छाजेड यांनी केले.

नगर येथील इ.१०वी ची विद्यार्थीनी कु.ईशा लांडे हिने 'कोल्ह्याने केलेली शिकार' या छायाचित्रास राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल तिला प्रोत्साहन-प्रेरणा देण्यासाठी स्नेह ७५ च्यावतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रमोदकुमार छाजेड, इंजि.ऋषीकेश लांडे, अभय गांधी, विश्वनाथ पोंदे, डॉ.शशी उदास, सौ.रजनी ढोरजे, किशोर रेणाविकर आदि उपस्थित होते.

श्री.छाजेड म्हणाले, कमी वयात कु.ईशा लांडे हीने मिळविलेले राष्ट्रीय स्पर्धेत मिळविलेले यश कौतुकास्पद असेच आहे. या यशातून तिला पुढील दिशा ठरविण्यास मोठी मदत होणार आहे. आपले ध्येय अचूक ठेवले की यश नक्कीच मिळते. फोटोग्राफित संयम आणि तत्परता हा महत्वाचा भाग आहे, त्यांचा पुरेपुर उपयोग कु.ईशाने केला व ती यशस्वी झाली. याचा सर्वांनाच अभिमान आहे.

सत्कारास उत्तर देतांना ईशा लांडे म्हणाली, वडिल वन्यजीव छायाचित्रकार असल्याने पशु-पक्षांशी नेहमीच संबंधी येतो. पशु-पक्षांवर उपचार करत असताना मी वडिलांना मदत करते, त्यामुळे पशु-प्राण्यांबद्दल प्रेम असल्याने त्यांचे छायाचित्रे मी नेहमी काढत असते. या छंदातूनच नगर परिसरात भटकंती करतांना कोल्हा तोंडात मृत प्राण्याचा सांगडा घेतलेला दिसला व मी फोटो क्लिक केला. चांगला फोटो मिळाल्याने तो स्पर्धेसाठी पाठवला व त्याला राष्ट्रीय स्तरावरील बक्षिस मिळाले. या गोष्टीचा मोठा आनंद वाटतो. स्नेह ७५ च्यावतीने केलेल्या सन्मानामुळे आपणास प्रेरणा मिळणार असल्याचे कु.ईशाने सांगितले. शेवटी ऋषीकेश लांडे यांनी सर्वांचे आभार मानले.

कु.ईशा लांडे हिने 'कोल्ह्याने केलेली शिकार' या छायाचित्रास राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल तिला प्रोत्साहन-प्रेरणा देण्यासाठी स्नेह ७५ च्यावतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रमोदकुमार छाजेड, इंजि.ऋषीकेश लांडे, अभय गांधी, विश्वनाथ पोंदे, डॉ.शशी उदास, सौ.रजनी ढोरजे, किशोर रेणाविकर आदि. (छाया : प्रशांत बाफना)

# एका शेतकऱ्याचे निवेदन, धनंजय मुंडेंची तत्परता अन संपूर्ण देशात झाली योजना लागू!

## प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेतून फळ पिकांना स्वयंचलित ठिबक प्रणाली साठी मिळणार प्रति हेक्टरी ४० हजारांचे अनुदान

शेतकऱ्याने पत्र लिहून मानले मुंडेंचे आभार!

मुंबई - अकोला येथील शिवार फेरीच्या दौऱ्यात एका शेतकऱ्याने कृषिमंत्री धनंजय मुंडेंना स्वयंचलित ठिबक सिंचन योजनेसाठी अनुदान देण्याबाबत निवेदन दिले, धनंजय मुंडेंनी कृषी विभागामार्फत याबाबत केंद्राकडे पाठपुरावा केला आणि मुंडेंच्या या तत्परतेने सबंध देशभरात फळ पिकांना स्वयंचलित ठिबक सिंचन प्रणालीसाठी हेक्टरी तब्बल ४० हजार रुपये अनुदान देण्याचे निश्चित झाले! धनंजय मुंडे यांनी दाखवलेल्या या तत्परतेबद्दल निवेदन कर्त्या शेतकऱ्यासह असंख्य शेतकऱ्यांनी आभार मानले आहेत.

झाले असे की, कृषिमंत्री धनंजय मुंडे हे मागील महिन्यात डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे शिवार फेरी कार्यक्रमाच्या निमित्ताने आले असता, बुलडाणा जिल्ह्यातील शेतकरी सचिन अग्रवाल यांनी श्री मुंडे यांना निवेदन दिले होते. संत्रा फळ पिकाची गळती झाली असून, फळ बागांना स्वयंचलित ठिबक सिंचन प्रणाली बसवण्यासाठी अनुदान देण्यात यावे, अशी विनंती अग्रवाल यांनी निवेदनाद्वारे केली होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्र सरकारच्या कृषी योजनांचा आढावा घेत असताना प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेत काही सुधारणा सुचवल्या होत्या. धनंजय मुंडे यांनी देखील शेतकऱ्यांच्या निवेदनाची दखल घेत याबाबत केंद्र सरकार कडे विभागामार्फत पाठपुरावा केला. केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेमध्ये राज्य सरकारने सुचवलेली सुधारणा स्वीकारत ऑटोमेशन अर्थात स्वयंचलित ठिबक प्रणाली विकसित करण्यासाठी प्रति हेक्टरी ४० हजार रुपये अनुदान देण्याचे निश्चित केले आहे. कृषी विद्यापीठातील तज्ञ, ऑटोमेशन क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधी, अनुभवी शेतकरी यांची एक समिती याबाबतचे निकष निश्चित करणार असून, या अहवालानंतर या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

दरम्यान राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे महाराष्ट्रातील नव्हे तर सबंध देशातील शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे!बुलडाणा जिल्ह्यातील सचिन अग्रवाल यांनी याबाबत एक पत्र लिहून धनंजय मुंडे यांचे आभार व्यक्त केले आहेत. याआधीही धनंजय मुंडे यांनी भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेत संत्रा कलमासाठी प्रति कलम ७० रुपये प्रमाणे अनुदान तसेच सेंद्रिय व रासायनिक खतांसाठी १००% अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आता फळ पिकांसाठी स्वयंचलित ठिबक सिंचन प्रणाली साठी हेक्टरी ४० हजार रुपये अनुदान मिळणार असल्याने फळ उत्पादक शेतकरी धनंजय मुंडे यांचे आभार व्यक्त करत आहेत.



निवेदनाचे फलित...

अनेक मंत्री, लोकप्रतिनिधी यांना जनतेतून अनेक निवेदने दररोज प्राप्त होत असतात, मात्र बऱ्याच लोकप्रतिनिधींकडे या निवेदनांचे पुढे काय होते, हा संशोधनाचा विषय ठरावा! मात्र धनंजय मुंडेंसारखे नेते याला अपवाद ठरतात. एका सामान्य शेतकऱ्याच्या निवेदनाची धनंजय मुंडे व त्यांच्या कार्यालयाने दखल घ्यावी आणि त्यातून एखादी योजना राज्यातच नव्हे तर सबंध देशातील शेतकऱ्यांना लागू व्हावी, हे उदाहरण म्हणजे आदर्श ठरावे असेच आहे!



# छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पेट्रोल पंपावर वाहनधारकांची मोफत हवेसाठी लूट

फुकटची हवा,परंतु तीही मिळेना ; सरपते

बीड:- मागील काही दिवसांपासून पेट्रोलपंपमध्ये स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, हवा मारण्याची मशीन चालू नसून काही ठिकाणी हवा मारण्याची मशीन चालू असून खाजगी इसमा कडून लूट होत आहे. छत्रपती शिवाजी चौकात असलेल्या पेट्रोल पंपामध्ये ही लूट सुरू आहे.

पेट्रोल पंप शहरात असो की शहराच्या बाहेर केंद्र व राज्य शासनाने सांगितलेल्या सूचनांचे पालन पेट्रोलपंप चालकांनी करणे गरजेचे आहे. स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी हवा मारण्याची मशीन, आदी बाबी तर नित्याच्याच आहेत. परंतु शहरातला एखादा पेट्रोल पंप सोडला तर बहुतांश ठिकाणी यातली कोणतीच सुविधा पहायला मिळत नाही. गत

तीन-साडेतीन वर्षापासून महागाईने कळस गाठला असून बाहेर हवा मारणे ही कठीण होऊन बसत आहे. शासनाने सूचना केल्याप्रमाणे पेट्रोल पंपावर वाहन चालकांनी पेट्रोल भरल्यानंतर वाहन चालकांना त्यांच्या गाडीमध्ये हवा मोफत भरून द्यावी. असा केंद्र शासनाद्वारे लिखित नियम आहे. परंतु महागाईच्या काळात पेट्रोलपंपचालक शासनाच्या नियमांना सोयीस्कर बगल देत फुकटची हवा ही वाहनामध्ये भरत नाहीत. तरी मा. जिल्हाधिकारी मॅडम दीपा मुधोळ (मुंडे) आपण वरील प्रकरणी व्यक्तीशा लक्ष घालून आपल्या अधिनस्त पेट्रोल पंपावर स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी,हवा मारण्याची मशीन चालू करण्यासंबंधीत यंत्रणेला व हवा मारण्याचे १०रू घेणाऱ्या छत्रपती शिवाजी चौकातील पेट्रोलपंप चालका विरुद्ध दंडात्मक कडक कारवाई करुन उर्वरितांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.आणि मला ई-मेलवर अवगत करावे. कारवाई न झाल्यास अभिनव आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक तथा वंचितचे मिलिंद सरपते यांनी दिलाअसे दिलेल्या निवेदनात सामाजिक तथा वंचितचे मिलिंद सरपते यांनी म्हटले आहे.

# ६ व्या एकता मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन बाबा भांड यांच्या हस्ते होणार

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

'वेदनेला फुंकर माणुसकीची' हे ब्रीदवाक्य घेऊन गेल्या अनेक वर्षांपासून मराठवाड्यासारख्या ग्रामीण भागामध्ये साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य संस्थेमार्फत येत्या २१ व २२ डिसेंबर रोजी गोमळवाडा ता.शिरूर का.जि.बीड येथे ६ वे एकता मराठी साहित्य संमेलन संपन्न होत असून या संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध लेखक, साकेत प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर चे सर्वेसर्वा, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष, ३४ वे मराठवाडा साहित्य संमेलन, पैठण चे संमेलनाध्यक्ष, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते मा.बाबा भांड करणार असल्याची माहिती एकता फाउंडेशन चे पदाधिकारी नितीन कैतके, लखुळ मुळे आणि राजेश बीडकर यांनी दिली.



६ व्या एकता मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष अजिनाथ गवळी यांच्या अध्यक्षतेखाली व संमेलनाचे संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ.भास्कर बडे यांचे प्रमुख उपस्थितीत एकता कोअर कमिटीतील पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच संपन्न झाली त्यावेळी आदरणीय बाबा भांड यांचे साहित्य क्षेत्रातील भरीव योगदान लक्षात घेत एकताचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड व उपाध्यक्ष प्राचार्य माही शेख यांनी संमेलनाचे उद्घाटन बाबा भांड यांच्या हस्ते व्हावे असा प्रस्ताव बैठकीत मांडला. त्यास एकताचे सचिव पत्रकार गोकुळ पवार व कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर यांनी अनुमोदन दिले. व्यंगचित्रकार दिपक महाले, शिवचरित्रकार कैलास तुपे यांनी बाबा भांड यांच्या बालसाहित्यासह साहित्य क्षेत्रातील सर्वांगीण कार्यावर बैठकीत प्रकाश टाकला. चर्चेअंती एकमताने उक्त ठराव संमत झाल्याचे एकताच्या सल्लागार ड.भाग्यश्री ढाकणे व संस्थापक सदस्या रंजना फुंदे यांनी घोषित केल्याचे महिला आघाडीच्या पदाधिकारी मिरा दगडखैर, शोभा राजळे, रंजना डोळे, डॉ.शोभा सानप यांनी सांगितले. या बैठकीस एकताचे सभासद सेवाश्रमचे संचालक सुरेश राजहंस, श्रीम.मिनाताई उगलमुगले, महादेव राऊत, पो.कॉ.ज्ञानेश्वर पोकळे, हरिप्रसाद गाडेकर, से.नि.पोलिस उपनिरीक्षक तुकाराम डमाळे, से.नि.केंद्रप्रमुख जालिंदर तावरे, सामाजिक कार्यकर्ते समीर पठाण, इंजि.संदीप ढाकणे, फौजी कैलास खेडकर, अभिमन्यू कातखडे, महादेव कातखडे, प्रा.महेश नागरे, देविदास शिंदे, इम्रान शेख यांचेसह शिरूर कासार व गोमळवाडा परिसरातील साहित्यप्रेमींची उपस्थिती होती

# मातंग समाजाच्या मागण्यांकडे भाजपा सरकारकडून दुर्लक्ष - सुरेशचंद्र राजहंस

## आरक्षणप्रश्नी आत्महत्या केलेल्या अंकुश खंदारेला १० लाखांची आर्थिक मदत द्या

मुंबई - आरक्षणाचा फायदा सर्व जातींना समान व्हावा यासाठी आरक्षणाचे अबकड वर्गिकरण करावे अशी मागणी मातंग समाज सातत्याने करत आहे परंतु भारतीय जनता पक्षाचे सरकार त्याकडे दुर्लक्ष करत आहे. आरक्षण वर्गिकरणासाठी संजय ताकतोडे पाठोपाठ चिखली, बुलढाणा येथील अंकुश समाधान खंदारे या २५ वर्षाच्या तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. अंकुश खंदारेवर आत्महत्या करण्याची वेळ सरकारमुळेच आली, सरकारने याची दखल घेऊन अंकुश खंदारे यांच्या कुटुंबाला तातडीने १० लाखाची मदत द्यावी व आरक्षण वर्गिकरणावर निर्णय घ्यावा, अशी मागणी मातंग समाजाचे नेते व काँग्रेस प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस यांनी केली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील अंकुश समाधान खंदारे २५ वर्षाच्या मातंग समाजाच्या तरुणाने अ ब क ड आरक्षणाचे वर्गीकरण करावे. बार्टीच्या धर्तीवर आर्टी स्थापन करण्यात यावी या मागण्यासाठी गळफास घेऊन जीवन संपवले, त्याच्या खिशात सुसाईड नोटही मिळाली आहे. अंकुश समाधान खंदारे हा आईवडिलांना एकुलता एक मुलगा होता तसेच तो सुशिक्षित बेरोजगार होता. मातंग समाजाच्या अ ब क ड आरक्षणासाठी सरकारच्या टोलवाटोलवीने निराश होऊन त्याने टोकाचे पाऊल उचलले. मातंग समाजातील तरुणांनी टोकाचे पाऊल उचलू नये, समाजाच्या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी सरकारला जाब विचारू. संजय ताकतोडे व अंकुश खंदारे या मातंग समाजाच्या तरुणाचे बलिदान वाया जावू दिले जाणार नाही.

आरक्षण प्रश्नी भाजपा सरकार काही समाजाच्यासमोर नरमाईची भूमिका घेत त्यांच्या मागण्या तातडीने मान्य करत आहे परंतु मातंग समाजाच्या मागण्यांकडे दुरल्क्ष करत आहे. आरक्षण वर्गिकरणासाठी भाजपा सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला जात असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत मार्च महिन्यात यासंदर्भात बैठक झाली, त्यानंतर मंत्री शंभुराज देसाई यांच्यासोबतही बैठक झाली. सरकारने आरक्षण वर्गिकरणासाठी कर्नाटक व पंजाब राज्याचा अभ्यास दौराही आयोजित केला होता पण कसलाही ठोस निर्णय झालेला नाही, सरकार केवळ वेळकाढूपणा करत आहे, असेही राजहंस म्हणाले.

नाळवंडी (प्रतिनिधी) अमोल जाधव :- राज्यव्यापी संविधान रैली...२६ नोव्हेंबरला संविधान जिंदाबाद, संविधानाचा विजय असो म्हणत गाव असो की शहर असो सगळीकडे संविधान रैली काढून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येते अभिवादन करून भूमिका मांडत समारोप करावा :- ऑल इंडिया पँथर सेना राष्ट्रीय अध्यक्ष :- दीपक केदार.




खाजगीकरण हे आरक्षण विरोधी धोरण आहे.विकाऊ मीडिया अन् पत्रकारावरील कार्यवाही ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हत्या आहे. विचारवंत जेलमध्ये अन् उन्मादी संसदेत, देशव्यापी दलित अत्याचाराने थैमान घातल्यामुळे दलित, आदिवासी धोक्यात आला आहे. महिला मुलींवरील अत्याचारात मोठी वाढ झाली आहे, मनुस्मृतीत महिला जशा गुलाम होत्या त्याच दिशेने वाटचाल सुरू झालेली आहे. शिक्षण धोक्यात आहे, राजकीय गुलामी आलेली आहे, हुकुमशाही हिटलरशाहिने लोकशाही उद्धवस्त केली आहे. एविएम् मशीनने सत्ता हस्तगत करून लोकशाहीची हत्या करण्यात आलेली आहे. मुस्लिमांची मोब लींचींग, खोटा लव्ह जिहाद माध्यमातून हल्ले करण्यात आले. समानता, बंधुभाव, एकात्मता, न्याय, धर्मनिरपेक्ष भारताचे तुकडे करण्याचे काम या मनुवादी विचारसरणीच्या व्यवस्थेने केलेले आहे. आम्ही संविधान बदलायला आलो म्हणणारा खासदार यांच्याकडे आहे. संविधान जाळण्याची हिंमत करणारे या सत्तेत पैदा झाले. आरक्षण संपवण्याची भाषा सुरू झाली त्यामुळे यांचे संविधान विरोधी मनसुभे उघडे पडले आहेत. अनेक भोंदूना मैदानात उतरून त्यांच्याकडून धर्म राष्ट्राची भाषा सुरू केली आणि तोच आमचा अजेंडा असल्याचे जाहीरपणे सांगू लागले.याद राखा, आपल्याला एकच आधार आहे जो माणूस म्हणून समानतेची वागणूक देतो ते आपलं संविधान ते वाचवायचे असेल तर आज भूमिका घ्यावीच लागेल आणि त्यांच्या रक्षणासाठी आम्ही सज्ज आहोत हे आता दाखवावेच लागेल. आपल्या जगण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो आधार दिला ते संविधान वाचवायचे आहे. संविधानाचे शत्रू उघड झालेले असून मनुवादी हाच आपला मुख्य शत्रू आहे.त्यामुळे मोठ्या ताकदीने संविधान रैली यशस्वी करण्याचे आव्हान ऑल इंडिया पँथर सेना राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांनी केले.

# संविधान सन्मान महारॅली यशस्वीतेसाठी शेकडो कार्यकर्त्यांची व्यापक बैठक संपन्न

## संविधान सन्मान रॅलीत सहभागी होऊन ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदर व्हावे -अशोक हिंगे पाटील

उस्मानाबाद ।प्रतिनिधी

२५ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील शिवाजी पार्क वर होत असलेल्या संविधान सन्मान महारलीत मोठ्या संख्येने उपस्थित राहून ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी उस्मानाबाद येथील जिल्हास्तरीय बैठकीत बोलताना सांगितले. भारताचे संविधान सर्वांना समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, हक्क, अधिकार, बहाल करते, तेच संविधान बदलण्याची काही विघातक शक्ती भाषा करत आहे.




सविधान जळण्याची भाषा करत आहेत त्या शक्तींना रोखण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे नेते एड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली संविधान सन्मान महारॅली व सभेचे आयोजन मुंबई येथे करण्यात आले असून या रॅलीत लाखो भारतीय सहभागी होणार आहेत आपण देखील पाठीमागे न राहता उस्मानाबाद जिल्ह्यातील सविधान प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे अहवाल हिंगे पाटील यांनी केले आहे.

या जिल्हास्तरीय बैठकीला उस्मानाबाद प्रभारी तथा मराठवाडा महासचिव रमेश गायकवाड जिल्हाध्यक्ष बि.डी. शिंदे, जिल्हा, तालुका, शहर, पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उस्मानाबाद येथे वंचित बहुजन आघाडी मध्ये इंजि. आसिफ शेख यांच्यासह असंख्य मुस्लिम तरुणांनी अशोक हिंगे पाटील यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.




बीड ।प्रतिनिधी

धनंजय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने रस्त्यावर, फुटपाथवर व जिव्हाळा येथील बेघरांना दिवाळी फराळ वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविला आणि त्यांच्यासोबत दिवाळी साजरी केली. धनंजय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने राष्ट्रीय कुस्तीपटू, पोलीस वुमेन तथा मिस महाराष्ट्र प्रतिभा बबनराव सांगळे यांच्या वतीने यावर्षी दिवाळी सणानिमित्त रस्त्यावरील सर्वसामान्य गोरगरीब व बेघरांना दिवाळी माहीत न होणार्या लोकांच्या मनात दिवाळी चा आनंदोत्सव गोड करून दिवाळी साजरी करण्यासाठी जवळपास १०१ लोकांपर्यंत फराळ पोहोचवून त्यांनी माणुसकी दाखवली. यावेळी प्रतिभा सांगळे यांच्यासोबत धनंजय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष धनंजय बबनराव सांगळे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.


# संविधान सन्मान महारॅली यशस्वीतेसाठी शेकडो कार्यकर्त्यांची व्यापक बैठक संपन्न

## संविधान सन्मान रॅलीत सहभागी होऊन ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदर व्हावे -अशोक हिंगे पाटील

उस्मानाबाद ।प्रतिनिधी

२५ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील शिवाजी पार्क वर होत असलेल्या संविधान सन्मान महारलीत मोठ्या संख्येने उपस्थित राहून ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी उस्मानाबाद येथील जिल्हास्तरीय बैठकीत बोलताना सांगितले. भारताचे संविधान सर्वांना समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, हक्क, अधिकार, बहाल करते, तेच संविधान बदलण्याची काही विघातक शक्ती भाषा करत आहे. सविधान जळण्याची भाषा करत आहेत त्या शक्तींना रोखण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे नेते एड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली संविधान सन्मान महारॅली व सभेचे आयोजन मुंबई येथे करण्यात आले असून या रॅलीत लाखो भारतीय सहभागी होणार आहेत आपण देखील पाठीमागे न राहता उस्मानाबाद जिल्ह्यातील सविधान प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे अहवाल हिंगे पाटील यांनी केले आहे.

या जिल्हास्तरीय बैठकीला उस्मानाबाद प्रभारी तथा मराठवाडा महासचिव रमेश गायकवाड जिल्हाध्यक्ष बि.डी. शिंदे, जिल्हा, तालुका, शहर, पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उस्मानाबाद येथे वंचित बहुजन आघाडी मध्ये इंजि. आसिफ शेख यांच्यासह असंख्य मुस्लिम तरुणांनी अशोक हिंगे पाटील यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT